Vol 6 Issue 2 Nov 2016

ISSN No : 2249-894X

## *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor :3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 2 | November - 2016

Review Of Research

# भारतीय संगीतात अध्यात्म तत्त्व

डॉ. सौ. अर्चना माधव अंभोरे
सहयोगी प्राध्यापक , श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला .

सारांश (Abstract ):
भारतीय षड्दर्शना सोबतच भारतीय संगीतशास्त्र देखील 'ब्रम्ह-संबंधी' चिंतनाचा विषय आहे. मानवी जीवनाचे अंतिम लक्ष्य परमेश्वर प्राप्ती होय आणि लक्ष्यप्राप्तीचे साधन संगीत असल्याने, संगीतास आध्यात्मिक अनुष्ठान मानले गेले आहे. 'सामवेदा' शिवाय 'ब्राम्हण संहिता', 'गंधर्ववेद', 'प्रज्ञतिशाख्य', 'नारदीय शिक्षा' छांदोग्य उपनिषद इ. ग्रंथ याचा दाखला देतात. नाट्यशास्त्र, विष्णुधर्मोत्तर पुराण, संगीत रत्नाकर इ. याच चिंतन धारेचे ग्रंथ आहेत.
आज संपूर्ण भारतात प्रचलित संगीत परंपरा 'सामवेदा'शी संबंधित आहेत. आणि हेच कारण आहे की वर्तमान भारतीय संगीत प्रणाली समस्त मानवाला शांति प्रदान करण्यास समर्थ आहे.

श्री गणेशा विद्याधिशा तवपदी मी अर्ध्य वाहिले ।
देव आणि दैव उभयतां जया विषयांमाजी स्थिरावले ।
वेदांती ब्रम्हज्ञान षड्दर्शनी गान सरस्वती पदी मन रमले ।
डमरु धर शिवशंकर पदी सत्य शिवं तत्व देखिले ।

हिंदुस्थानामध्ये षड्दर्शना प्रमाणेच संगीतशास्त्र देखील एक ब्रम्हज्ञानासंबंधीचे प्रभावी विचारपूर्ण चिंतन आहे. तशातून मानवी जीवनाचे परम उद्दिष्ट परमेश्वरी साक्षात्कार मानले आहे व या साक्षात्काराचे किंवा उद्दिष्टाचे सर्वोत्तम माध्यम संगीत असल्यामुळे त्याला अध्यात्माच्या रंगात पूर्णत्वाने रंगविण्याचे यत्न केले गेले आहेत.
नयन म्हणजे 'डोळे' प्रतिक्षण संसारातील अथवा जगातील वस्तूंचे दर्शन करवितात, येथपर्यंत ती मर्यादा वाढते की झोपल्यानंतर देखील आपण पाहतो ते स्वप्न! पुढील पदामध्ये केलेले वर्णन अति सार्थक वाटते.

तुज स्वप्नि पाहिले रे गोपाळा ।

या पदासारखेच एका संतकवींचे पद आहे. ती संत व्यक्ति म्हणजे 'संत चोखोबा' चोखोबा महाराजांची पत्नी सोयराबाई संत चोखोबा जुन्या वर्ण व्यवस्थेतील मागासवर्गीयात जन्मले. म्हणून संत सोयराबाई आपल्या पदाच्या शेवटी म्हणते - 'म्हणे चोखियाची मराहीण' ही छाप पदातील आंतरिक स्थितीचे दर्शन घडविते.
अवघा रंग एक जाला । रंगी रंगला श्रीरंग ।
....................................
पहाता पाहणे गेले दुरी । म्हणे चोखियाची महारी ।

## परमेश्वराचे 'आंतरिक रंग' व 'बाह्यरंग' :

'चक्षुर्वेये सत्यम्' बघण्याची वृत्ति देवाने या भक्तांच्या ह्दयात प्रचूर मात्रेत कोंबली होती. परमेश्वराचे दर्शन ही एक मनोमनीची भूक संत विद्वानांची होती. 'दर्शन' शब्दाचा अर्थ देखील 'पाहणे' किंवा देखणे संबंधित आहे. संत ज्ञानेश्वर या संत माऊलींचा एका अभंगात, किंवा 'भक्ति प्रचूर' पदात किती सुंदर वर्णन केले आहे, ते बघा -

'अधिक देखणे तरी निरंजन पाहणे
योगिया दुर्लभ तो मी देखिला गे माये ।'

दर्शन शास्त्र देखील हेच सांगते. 'दर्शन' अर्थात 'पाहणे', 'देखणे' किंवा आपल्या नयन चक्षुंनी 'अवलोकणे' असा अर्थ होतो.

''दृष्यते अनेन इति दर्शनम् ।''

अर्थात ज्या द्वारे पाहिले जाणे किंवा पाहण्या योग्य 'वस्तू' याच जिज्ञासे पोटी 'दर्शन' ची उत्पत्ति मानली गेली आहे. अनादि-काळापासून हिंदूस्थानी चिंतन परंपरेत ही जिज्ञासा असल्याचे दिसून येते. मनुष्य कोण आहे? मानवी उत्पत्ति कशी झाली.? 'मनुष्य', ज्याचे अस्तित्व अेका बिंदू पेक्षा देखील सूक्ष्म आहे, त्या जगताच्या सृष्टिची निर्मिती कशी झाली. तिचा सृजनकर्ता कोण? तो 'जड' आहे की 'चेतन' त्याच्या सोबत मानवाचा कांही संबंध किंवा नाते आहे कां? त्या सोबतचा संबंध कसा प्रस्थापित होऊ शकतो? त्याचा मार्ग कोणता? या शंका किंवा जिज्ञासेसंबंधी आमच्या संत, महात्मे व ऋषिंनी अनेक मार्ग शोधलेले आहेत, त्यांचे कांही सिद्धांत मांडलेले आहेत, त्यास 'विविध दर्शन' असे म्हणतात.
'दर्शना' ला पर्यायी शब्द 'फिलॉसाफी' मानतात. फिलॉसॉफी म्हणजे ज्या शास्त्रात जीव, जगत, ईश्वर, धर्म अधर्म, सत्-असत् इ. तत्त्व शोधण्याचा प्रयत्न होतो. भारतीय तत्त्ववेत्ते सांगतात की बुद्धी सत्याचा साक्षात्कार करु शकत नाही फक्त अंश मात्राचे ज्ञान अवगत करु शकतात.' म्हणून द्रष्ट्यांनी ज्ञान मार्गापेक्षा भक्ति मार्गाची महती वर्णिलेली आहे. ब्रम्ह तत्त्वाच्या सत्चित वृत्तिपेक्षा 'आनंद' हेच भक्त, ज्ञानी व योगी व्यक्तीचे अंतिम उद्दिष्ट्य दिसून येते.
अनुभूतीच्या रुपात त्या ज्ञानाची प्राप्ती होते व ते ज्ञान प्राप्त होताच जीवन ज्ञान पूर्ण होते आणि



म्हणून भगवद्गीतेत ज्ञान आणि विज्ञानाची महती त्या अध्यायात वर्णिलेली आहे.

आचार्य भरतमुनी व पं. शारंगदेव या दोन्ही शास्त्रकारांनी सामवेदाच्या स्वरांना शुद्ध मानलेले आहे. आधुनिक संगीत पद्धती सामवेदा संबंधीची आहे. या पंडितांनी सिद्ध केले आहे की भारतीय संगीत प्रणाली बिथरलेल्या मानवाला शांति प्रदान करण्यात सक्षम आहे.

भारतीय विचारधारा नितांत आदर्शाच्या पृष्ठभूमीवर चालत आलेली आहे व भारतीय संस्कृतीचे प्रयोजन लोककल्याण दिसून येते. या संस्कृतीच्या रोमारोमांत राम, कृष्ण, बुद्ध, महावीरांचे आत्मा सामावलेला आहे.

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, असंग्रह, या पांच व्रतांना या देशाचे लोक युगानुयुगे आत्मसात करीत आलेले आहेत. आजच्या या कलुषित आणि धर्मवेड्या लोकांच्या जगात आपला देश पंचशील मानणारा आहे. अशा आणिबाणी युक्त काळामध्ये या देशाची वाणी, या देशाचे संगीत कां बरे विश्व कल्याणकारी होणार नाही? अमेरिकेसारखे प्रगत राष्ट्र भारताच्या योग व संगीताकडे आकृष्ट होण्याचे एकच कारण आहे की अमेरिकेचे मनोवैज्ञानिक सर ॲक्टेव्हिन ह्युम यांनी आपले विचार प्रकट करतांना असे लिहिले आहे की तेथील ३० टक्के पेक्षा अधिक लोक विक्षिप्त अवस्थेत आहेत.

बिटनिक नांवाच्या व्यक्तिचे जीवन देखील विलक्षण आहे. आपल्याच धुंदीत विहार करणे. कपडे फाडणे, जोराने आक्रोश करणे, केस न कापणे, दिवसभर नशेत चूर राहणे इ. बाबी त्यांच्या अतृप्त जीवनाचे द्योतक होय. अतृप्त आत्मे आत्मिक शांतीच्या शोधामध्ये गर्क आहेत. तेथील तणावपूर्ण वातावरणापासून दूर जावून भारतीय संगीताच्या स्वर गंगेमध्ये डुंबून जातात तेंव्हा त्यांना एक अपूर्व, अलौकिक दैवी अनुभव प्राप्त होतो. भारतीय संगीत कलाकारांनी संगीताच्या आत्म्याची पारख केली. भारतीय संगीत साधक व संगीत आराधना करणाऱ्या पंडितांनी आपले उद्दिष्ट मोक्ष प्राप्ती मानले आहे. परमात्म्या सोबत संबंध दृढ करणे व संगीताला आपल्या भक्तिचे माध्यम बनविण्याचे काम त्यांनी केले. भारतीय संगीत महर्षि व विद्वानांनी संगीताचा आत्मा परखला होता.

श्रुति, स्वर, ताल, राग व वाद्ययंत्रे यांचा देवी देवतांशी असलेला संबंध यांचा सखोल विचार केलेला आहे. नारदीय शिक्षा या ग्रंथात नादाच्या देवता, वर्णादिंची नांवे दिली आहेत.

प्रतिसाख्य ग्रंथात देवतांच्या नावाचा उल्लेख दिसून येतो. भगवान शंकराचे डमरु वाद्याचे ध्वनि, त्याचप्रमाणे अ ई उ मधून क्रमश: सारंग, ए, ओ पासून म प, ऋ व ऌ पासून तृतीय प्रकारच्या स्वरांची किमया दिसून येते. भगवान श्री कृष्णाच्या बांसुरीच्या स्वरांनी, गोप-गोपी व गवळी मुग्ध होऊन जात.

संतज्ञानेश्वर माऊलीला ज्ञानेशाची कन्या म्हणवून घेणारे महान पंडित संत गुलाबराव महाराजांनी संगीतातील अध्यात्माबद्दल आपले मन प्रगट केले आहे ते अंध असून देखील त्यांनी विविध ग्रंथाचे लेखन केलेले आहे. त्यांचा आंधळी गौळण अेक काव्य संग्रह प्रकाशात आलेला आहे. परम संत श्री. गुलाबराव महाराज ज्ञानेश्वरांना माऊली आणि सद्गुरू मानतात. ते ज्ञानेश्वरांना ते ज्ञानेश्वरांना परमात्मा स्वरुपात पाहतात.

संत ज्ञानेश्वर माऊलीचा ते 'आत्मानंद विग्रह'' या शब्दांनी उल्लेख करतात. 'आत्मानंदाची मूर्तिमंत आकृती' अशा या ज्ञानेश्वर रूपी परमात्म्याची सुरांनी व सुरांच्या शास्त्राने पूजा बांधण्याचा संकल्प महाराजांनी मांडला आहे.

संगीत कलेला परमतत्त्वाचा हा स्पर्श घडावा लागत नाही तो नैसर्गिक स्वरुपात असतोच.

भारतीय संगीत ही उपासना आहे. स्वरांमधून नादब्रह्माची अभिव्यक्ति होणे व स्वरापासून नादब्रह्माची अभिव्यक्ति होणे हे संगीत कलेचे मूर्धन्यभूत प्रयोजन संत गुलाबराव महाराजांनी वारंवार सांगीतले आहे. संगीताचे आध्यात्मिक महत्व सांगणे म्हणजे स्वअभिप्राय प्रगट करणे होय. ते म्हणतात. -

यद्य पितुझिया प्रेमाच्या ठायी
संगीताची अपेक्षा नाही.
तरी तुझियास्तव संगीतश्रम करणे लवलाही ।
येणे काय प्रेम तुटे?

## *भक्ति आणि संगीत :*

गान सोपान या ग्रंथाचे रचनाकार महर्षि संत गुलाबराव महाराज यांनी भक्ति आणि संगीताविषयी आपले मत मांडले आहे. ते म्हणतात. परमेश्वर भक्ति व संगीताचे अर्थाअर्थी काय संबंध आहे? भगवत् प्रेमाला संगीताची अपेक्षा नसते. मात्र संगीत साधना करायचीच असेल तर परमेश्वर प्राप्तिसाठी केली तर परमेश्वर प्रेमाला उजाळा मिळतो.

वैष्णव भक्ति शास्त्राचे नवविधा भक्तीपैकी अर्चन कीर्तन या संज्ञेचा उल्लेख महाराजांनी मुद्दाम केलेला आहे. महाराजांना असे वाटते की ते म्हणतात - ठायी अर्चनाचे सामर्थ्य नाही. मात्र कीर्तन गायनाचे आहे. परमेश्वराला भक्ताकडून संगीताची अपेक्षा नसली तरी संगीतोपासकाला आपल्या कलेसाठी भगवत्निष्ठा आवश्यक आहे.

## *संगीताचे अध्यात्म :*

महाराजांनी आपले मत मांडताना नादब्रह्माच्या केलेल्या नमनाने प्रारंभ केला आहे. संगीत रत्नाकर ग्रंथाचा त्यांनी आधार घेतलेला आहे.

''चैतन्य सर्व भूतानां विवृतं जगदात्मना
नाद ब्रह्म तदानंद्रम व्दितीयमुपासते''
(गान सोपान/संत गुलाबराव महाराज पृष्ठ ७७)

ते स्पष्टपणे आपले विचार प्रगट करतात. ते म्हणतात, 'चैतन्य म्हणजे वेदांतामध्ये वर्णित परब्रह्म या स्वरुपात केले असुन संगीत ही त्याची म्हणजे त्या नारदरुपी परदेवतेची उपासना होय,' या श्लोकावर पं. कल्लिनाथांची विस्तृत व्याख्या आहे. त्यांत त्यांनी रूप आत्म्याद्वारे समस्त पदार्थ प्रकाश तत्वाच्या नादाच्या धर्मामुळे त्याला चैतन्य म्हटले आहे. 'नादाच्या ठायी श्रूति, वर्ण, स्वर इत्यादी सकल शब्दप्रपंचाचा आभास होत असल्याने नाद हे नाम रूपात्मकम जगताचे अधिष्ठान सत् आहे, किंवा नादच जगद्रूपाने विवृत झाला आहे.

शारंगदेवाने नादाचे तिसरे विशेषण सांगीतले आहे. ते म्हणजे आनंद. याची व्याख्या करतांना काल्लिनाथ म्हणतात- 'नाद हा आनंदाचा अभिव्यंजक असल्याने त्यावर प्रत्यक्ष अभिव्यंजकाचा आरोप करून त्याला आनंदच म्हटले आहे. तसेच नादाला अद्धितीय म्हणण्याचे काव्य ब्रह्माप्रमाणेच स्वरादिप्रपंचरूप स्वकार्याचे एकमेव कारण होय. तद् म्हणजे 'सर्वलोक'. प्रसिद्ध नादावर ब्रह्माचा अभेदाने आरोप केला आहे. व त्याची उपासना सांगीतली आहे. त्याची उपासना यावर कल्लीनाथ असे म्हणतात.

परावाक्पर्यायस्य ब्रह्मशक्तिर्नादस्य
परावाक्पर्यायस्य ब्रह्मशक्तिर्नादस्य ब्राह्मणोत्यंत प्रत्यासन्नत्वाद
उपासनायां कृताया ब्रह्म प्राप्तिर्मणिप्रभाप्रवृत्तस्य
मणिलाभवद्भवेदिति ।

भावार्थ - नाद ही ब्रह्मशक्तिच होय. तिलाच परा वाक् हे दूसरे नांव आहे. ब्रह्माला अत्यंत प्रत्यासन्न ही निकट शक्ति आहे. तिची उपासना केली असता मणिप्रभा न्यायाने ब्रह्माची प्राप्ति होऊ शकते. संगीत नाद उपासना म्हणजेच ब्रह्म शक्तिचेच केलेली ब्रह्माची उपासना होय. संगीताचा हा वेदांत होय व संगीताचे तेच अध्यात्म होय. याचा उलगडा संत गुलाबराव महाराजांनी गान सोपानच्या द्वितीय प्रकरणात केलेला आहे. त्याचा आधार अर्थातच शारंगदेवाचा श्लोक व त्यावर कल्लिनाथांची टिका होय. प्रारंभीच्या दहा ओव्यांमधून नादाच्या उपपत्ती सांगीतल्या आहेत. त्यांची पहिली उपपत्ती नादाच्या आनंद रूपतेची आहे. सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणी असलेले आत्मस्वरूप चैतन्या जगद्रुपात दृष्य होऊन भासते. परम चैतन्याचा तीन अंशापैकी सत् चित् हे अंश जगद्रुपात जसे व्यक्त आहेत. तसेच त्यांचा आनंदाचा अंशदेखिल नादरूपाने अविर्भूत झाला आहे.

## *निष्कर्ष :*

१)षड्दर्शना प्रमाणेच संगीतशास्त्र देखील एक ब्रम्हज्ञानासंबंधीचे प्रभावी विचारपूर्ण चिंतन आहे.
२)भारतीय संगीत ही उपासना आहे. स्वरांमधून नादब्रम्हाची अभिव्यक्ती होणे हे संगीत कलेचे मूर्धन्यभूत प्रयोजन आहे.
३)भगवत प्रेमाला संगीताची अपेक्षा नसते, संगीतसाधना करायचीच असेल तर परमेश्वर प्राप्तीसाठी केली तर परमेश्वर प्रेमाला उजाळा मिळतो.
४)नाद हे नामरुपात्मकम जगताचे अधिष्ठान सत् आहे.
५)परमचैतन्याचे सत् चित आनंदाचा अंश देखील नादरुपाने अविर्भूत आहे.

## *संदर्भ ग्रंथ :*

१. गर्ग, लक्ष्मीनारायण (१९७८) निबंध संगीत, संगीत कार्यालय, हाथरस.
२. शर्मा, सत्यवती (१९९४), ख्याल गायन शैली विकसित आयाम, पंचशील प्रकाशन, जयपुर - ०३
३. कुळकर्णी, रूपा (१९८१) गान सोपान, विश्वसंत साहित्य प्रतिष्ठान, गोकुळ, घरारे बंगला, नागपूर.
४. संगीत कला विहार (एप्रिल १९८९), अ.भा. गांधर्व महाविद्यालय मंडळ मिरज.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com